Vol 6 Issue 6 Dec 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# व्यवस्था परिवर्तनासाठी हुंदाडी

प्रा. डॉ. युवराज श्रीराम मानकर
मराठी विभाग , शिवशक्ती कला, वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगांव, जि. यवतमाळ.

**सारांश –**
'हुंदाडी' हा कवी प्रकाश नामदेव खरतडे यांचा कविता संग्रह असून या कवितासंग्रहा वरील 'व्यवस्था परिवर्तनासाठी हुंदाडी' हा समीक्षणात्मक लेख आहे या लेखात कवीचा परिचय, कवीची प्रकृती, त्यांच्या काव्याची प्रेरणा, कवीपुढे असलेले सामाजिक–सांस्कृतिक वास्तवातील आव्हाने 'हुंदाडी' या कविता संग्रहाचा आशय आणि त्या आशयाची केलेली अभिव्यक्ती यालेखात कवीच्या कवितेचा आधारे मांडण्यात आली आहे आणि या सर्व आकलनातून निर्देशनात आलेली काव्य वैशिष्ट्ये यांची नोंद केली आहे.

## कवी परिचय –
आंबेडकरी चळवळतील एक निष्ठावंत कार्यकर्ता प्रकाश खरतडे यांचा नुकताच 'हुंदाडी' हा दुसरा कविता संग्रह प्रकाशित झाला. यापूर्वी त्यांच्या 'तांबार' या कवितासंग्रहाने त्यांची कवी म्हणून काव्यविश्वाला ओळख करून दिली. त्यांच्या 'सूड' आणि 'मी भीमाचा दिवाना' या पथनाट्याने नाट्यक्षेत्रात पथनाट्यकार म्हणून त्यांचा गौरव केला. त्यांच्या नावातील प्रकाशाने चौफेर प्रकाश पेरला. या प्रकाशाचेच द्योतक त्यांचा 'हुंदाडी' हा कवितासग्रह आहे. या कवितासंग्रहाला अत्यंत बोलके मुखपृष्ठ सुप्रसिद्ध चित्रकार बळी खैरे यांनी दिले आहे आणि अत्यंत अभ्यासपूर्ण आणि न्याय देणारी प्रस्तावना आकांतकार मा. बाबारावजी मडावी यांनी दिली आहे.या कवितासंग्रहात एकूण छत्तीस प्रकारच्या कवितांचा समावेश आहे. त्यांच्या या छत्तीस




कवितातून त्यांनी छत्तीस प्रकारच्या कवितेच्या प्रकृतीच्या स्वभावाचे दर्शन घडविले आहे.

## कवींची प्रकृती –
कवीची बाह्यगत प्रकृती अतिशय धष्टपुष्ट आहे. तशीच त्यांच्या मनाची ही प्रकृती धष्टपुष्ट आहे. त्यांचे मन कोणत्याही विकृत सत्तेला गुलाम झालेले नाही. तर विकृतीला नाहीसे करण्यासाठी मनाच्या व डोक्याच्या सशक्त प्रकृतीने ते तोंड देतात. त्यासाठी त्यांचे मन हे स्वतंत्र आहे हे स्वतंत्र मनच प्रकृतीची धारणा करून विकृतीला तोंड देणारे आहे. आर्थिकदृष्ट्याा कवी संपन्न नसला तरी वैचारिकदृष्ट्याा तो संपन्न आहे.पण कवी दारिद्र्यामुळे कधी लाचार झाला नाही तर वैचारिकदृष्ट्याा तो गर्भश्रीमंत असल्याने कृती आणि उक्ती यात त्याने कधीही तफावत ठेवली नाही. नव्हे दारिद्र्य निर्मूलनासाठी तो पेटत्या झोत भट्टीत आपले आयुष्य कंठीत असला तरी तो वैचारिकदृष्ट्याा मार्क्सच्या दावणीला बांधला गेला नाही आणि आपल्या वैचारिक चारित्र्याचा कधी भ्रष्टाचार केला नाही. सामाजिक– सांस्कृतिक आणि आर्थिक प्रश्नांची उकल तो आपल्या आंबेडकरी प्रमाण शास्त्राच्या निष्ठेनेच करतो आहे. कवी सच्चा, प्रामाणिक आंबेडकर वादी आहे.त्यामुळे कवीला वैचारिक व वर्तनातील भ्रष्टाचार आवडत नाही. अतिरेकी तृष्णेच्या आहारी गेलेले वैचारिक बुड गमावून बसलेले, संधीसाधू, स्वार्थांध मानवी जीवन त्यांना अजिबात पसंत नाही. धर्म विचारल्याने जात कळत नाही म्हणून जात विचारणारे, जात आणि पोटजात बाळगणारे, जातीच्या अहंकाराने उन्मत्त झालेले, रूढी, परंपरेच्या देव, दैववादाच्या, अंधश्रद्धेच्या मार्गाने प्रवास करणारे जीवन त्यांना नकोसेवाटते. शोषण व्यवस्थेशी संबंध ठेवणारे आणि विषमता राखणारे समाजजीवन हे कवीच्या प्रकृतीला पटत नाही असे नाना विकृतींनी माणूस आणि त्यांची मळलेली विकृत मानसिकता ही दुनियेच्या स्वास्थासाठी उपकारक नाही असे कवीला वाटते. आंबेडकरांच्या विचाराला, त्यांच्या धम्मक्रांतीला बेईमान झालेल्या माणसांबद्दल कवी अंगुलीमाला सारखी विद्रोही प्रकृती धारण करतो. कधी तळमळतो, अस्वस्थ होतो त्यांचे मन सुन्न होते. तर कधी प्रचंड माणसांचे, व्यवस्थेतील अंतर्विरोधग्रस्त जीवन पाहून प्रचंड चिडतो, संतापतो, प्रहार करतो. कवीकडे बुद्धाची प्रज्ञा, शील, करूणा आणि शांती आहे. त्यामुळे कवी माणूस माणसासारखा वागत नाही? माणूस आणि त्याचे नाते, त्याच्यातील अंतर्विरोधग्रस्तता शोषणकारी व्यवस्था या व्यवस्थेची होत चाललेली पुनरावृत्तीकडे तो बौद्धिक कळवळयाने पाहतो आणि त्यांच्यात परिवर्तन करण्यासाठी विधायक हुंदाडी देतो.

## कवींच्या काव्याची प्रेरणा –
प्रकाश खरतडे यांच्या काव्याची प्रेरणा आणि आदर्श हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत भारतीय जीवनातील 1920 ते 1956 हा काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृती आणि उक्तीचा होता. त्यांच्या कृती उक्तीने सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात महानक्रांती केली. त्यांच्या कृती–उक्तीतून विसाव्या शतकात एक क्रांतिकारी तत्त्वज्ञान निर्माण झाले. त्या तत्त्वज्ञानाचे नाव 'आंबेडकरवाद' म्हणून जगमान्य झाले.

आंबेडकरवाद स्वातंत्र्य, समता, सहजीवन, सामाजिक न्याय, आर्थिक लोकशाही, समाजवाद या सर्व कल्याणकारी ध्येयसिद्धीकडे जाणारा महामार्ग आहे आणि हे ध्येय साध्य करतांना रक्ताचा एकही तेंब न सांडवता सामाजिक आणि आर्थिक क्रांती घडवून आणणे हा त्याचा प्रस्ताव आहे. आंबेडकरवाद मानसिक प्रबोधनाला आणि विधायक परिवर्तनाला अनन्यसाधारण महत्त्व देणारा आहे. या प्रबोधनासाठी व विधायक

परिवर्तनासाठी तो शोषणाच्या, विषमतेच्या विचारांशी, परंपरांशी आणि त्या संस्काराशी कुठलेही नातेसंबंध ठेवू इच्छित नाही तर तो त्यांच्यात मतपरिवर्तन घडवून आणणारा आहे. ज्या मनावर शोषणकारी तत्त्वज्ञानाचे थंब इम्प्रेशन उमटले आहे त्याचे ठस्से पुसून काढण्याचे काम विचाराशिवाय होत नाही. म्हणून आंबेडकरवाद विचारक्रांतीला जीवनातील आचारक्रांतीसाठी फार महत्त्व देतो. या आचारात क्रांती करावयाची असेल तर विचारक्रांती करण्यासाठी साहित्याशिवाय चांगला मार्ग नाही. साहित्यच जीवनात क्रांती घडवून आणू शकते असे आंबेडकर वाद मानतो. अशी साहित्याकडे पाहण्याची नवी दृष्टी आंबेडकरवादाने साहित्यिकांना दिली आहे. आंबेडकरवादाचे सर्व कल्याणकारी ध्येय आणि त्यांची साहित्यदृष्टी कवी प्रकाश खरतडे यांनी आपला आदर्श व आपल्या काव्याची प्रेरणा मानली. या कवीने येथे दजडपलेल्या माणसाचे दुःख मांडले, बुद्धाच्या करूणेने जीवनातील दुःखाचा वेध घेतला. आणि दुःखाला जन्म देणाऱ्याविरूद्ध हुंदाडी दिली. त्यांनी जीवनातील अमानुषता मांडली, त्यांनी शोषण मांडले, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे जगणे मांडले, विषमतेचे भयानकपण त्यांचे कठोर निदर्य अंतःकरण मांडले. विषमतेचे संगोपन करणारे, कर्मविपाक जन्माला घालून त्याद्वारे मानवी पशूता निर्माण करणारे, माणसा–माणसात भेद निर्माण करणारी चार्तुवर्ण व्यवस्था मांडली. जात–पोटजात मानणारा स्वानुभव मांडला. आंबेडकरद्रोही बेईमान वास्तव, फितूर झालेले राजकीय नेते आणि वैचारिक भ्रष्टाचार मांडला. 'हुंदाडी' या काव्यानुभवाच्या तळाशी आंबेडकरवाद आदर्श व प्रेरणा म्हणून उभा आहे. तोच या हुंदाडीचे संचालन व नियंत्रण करतो आहे. कारण कवीने आपले काळज आतून बाहेरून आंबेडकरी विचाराने गोंदून घेतले आहे.त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या मनाने, डोळयाने जीवनाकडे पाहिले. जीवनाकडे पाहण्याची ही आंबेडकरी दृष्टी त्यांनी आपल्या काळजावर नोंदलेल्या आणि गोंदलेल्या प्रेरणेची साक्ष आहे. कवींच्या जीवनदृष्टीला प्रेरणादर्श ठरलेला आंबेडकरवाद त्यांच्या सर्जनशील काळजातून निर्माण झालेल्या हुंदाडीतून प्रत्ययाला येतो. त्यांच्या हुंदाडीचा पाया आणि शिखर आंबेडकरवादच आहे. आंबेडकरवादच्या प्रेरणादर्शाने त्यांनी प्रस्थापित व विस्थापितातील प्रस्थापित झालेल्या व प्रस्थापितांच्या पारंपरिक शोषणकारी तत्त्वज्ञानाला आपले मानणाऱ्या आणि आंबेडकरवादाला बेईमान झालेल्या स्वसमाज व स्वसमाजत्तेरांशी हुंदाडी दिली आहे. त्यांच्या या हुंदाडीच्या पाठीमागे आंबेडकरवादी प्रेरणा व आदर्श कार्यरत आहे.

### *कवी पुढील सामाजिक– सांस्कृतिक वास्तवातील आव्हाने –*

'हुंदाडी' हा कवितासंग्रह समकालीन सामाजिक–सांस्कृतिक वास्तवाचे अपत्य आहे. समकालीन वास्तव अनेक चांगल्या आणि वाईट बाबींचा गर्भ घेऊन पुढे सरकत आहे. कवीला समकालीन सामाजिक– सांस्कृतिक वास्तवातील वाईटपण खुणावते आहे या अनिष्टपणावर मात करण्यासाठी कवी भारावलेल्या जीवनदृष्टीने हव्या असणाऱ्या सामाजिक–सांस्कृतिक जीवन स्वप्न साध्यासाठी आपले मन, मेंदू आणि मनगट एकवटून त्याने नव्या हुंदाडीचे सर्जन केले आहे. आंबेडकरवादाच्या प्रमाणशास्त्राने तयार झालेली कवीची जीवनदृष्टी समकालीन सामाजिक–सांस्कृतिक वास्तवाकडे आंबेडकरांच्या मनाने व डोळयांनी पाहते तेव्हा हे वास्तव दुनियेच्या स्वास्थासाठी त्याला उपकारक असलेले दिसत नाही तर अनेक विसंगतीने व अंतर्विरोधग्रस्ततेने भरलेले दिसते. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यामुळे एकूणच जीवनांचे विभाजन झाले आहे. त्यामुळे जीवनात जीवघेणी स्पर्धा पण ती तुल्यबळ असणाऱ्याशी नाही तर तुल्यबळ नसणाऱ्यांशी लागली आहे. या देशातील पुर्वीलाच जातीयतेचा बळी ठरलेला नागवलेला, चार्तुवर्ण्याच्या श्रेणी बद्धरचनेमुळे, धर्म, वंश, वर्गाच्या वर्चस्वामुळे आर्थिदृष्ट्या उदध्वस्त आणि उलंगवाडी झालेला माणूस आज या वर्तमान वास्तवात अधिकच होरपळत चालला आहे. एककीडे विज्ञान तंत्रज्ञान विकसित झाले तरी दुसरीकडे माणसाचे जगणे अंधश्रद्धा, देवभोळेपणा, कर्मकांडमूक्त झालेले नाही. आजचा माणूस एका हातात गीता आणि दुसऱ्या हातात संविधान घेऊन जगत आहे. तो देहाने भारतात राहूनही त्यांचे मन हिंदुस्थानात राहात आहे तो ओठात आंबेडकर आणि पोटात मनुचे संवर्धन करीत आहे तो डॉ. आंबेडकरांची धम्मक्रांती आणि मनुची प्रतिक्रांतीशी नाते ठेवत आहे.त्यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञेचा उच्चार आणि मनुवादी संहितेचा आचार करतो आहे. त्यांच्या मूल्यक्रांतीतील मुल्यांना बगल आणि मनुच्या मूल्यहीनतेला अगल करत आहे. तो आंबेडकरी जाती अंताऐवजी जात–पोटजात घेऊन जगू लागला आहे. वर्गामुळे आर्थिक दास्य निर्माण झाले असतांना त्याचे निर्मूलन मार्क्स नसून जातीअंत व वर्णव्यवस्था आहे. पण माणूस आज जात. पोटजात आणि वर्णव्यवस्थेच्या दावणीला स्वतःला बांधून घेतो आहे म्हणून कवी 'विकार' या कवितेत लिहितो

'तू ... माणूस असून
माणसासारखा वागत नाही
अन माणसासारखा जगत नाही
तू.... मनूच्या दावणीला बांलेला
नंदीबैल झाला'[1]

कवी समकालीन सामाजिक–सांस्कृतिक वास्तव येथे मांडतो. आंबेडकरी चळवळीत समाजकारण करणारे राजकीय बगळे समाजदेहाचे तुकडे करून स्वार्थांध, प्रचंड तृष्णेच्या आहारी गेले आहे. कवी समकालीन वास्तव 'काकलूत' या कवितेत मांडतात.

'माझी काकलूत गहिवरते तेव्हा
मला पेटलेली माणसे
कोळसा झालेली दिसतात
आणि दिसतात
फक्त त्या राख झालेल्या
माणसांची ढिगारं
तेव्हा मसनवट्यांचे
कुलूबंद दरवाजे पाहून
मी सैरावैरा पळत गेलो?
तीळ तीळ जळत गेलो.'[2]

जातीय वर्णव्यवस्थेने माणसाचे माणूसपण नाकारले. हा भेदभाव स्मशानभूमीपर्यंत पोहचला. माणसाचं माणूसपण जळन, राखं झाले, स्मशान भूमीचे दरवाजे जातीच्या धर्माच्या नावाने बंद झाले आहे. कवी या सामाजिक – सांस्कृतिक वास्तवाने अस्वस्थ होतो. ज्वालासारखा संतापून व्यवस्था परिवर्तनासाठी तो हुंदाडी देतो.

Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

## 'हुंदाडी' या कवितासंग्रहाचा आशय –

प्रकाश खरतडे यांचा 'हुंदाडी' हा काव्यसंग्रह वर्तमान वास्तवाने उभ्या केलेल्या समस्येचे खरे तर प्रतिउत्तर आहे. हे प्रतिउत्तर त्यांनी त्यांच्या कवितेतील भावसंवेदनेने आणि त्या भावसंवेदनेच्या तळाशी कार्यरत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधनाने दिले आहे. हे विचारधन माणसाला त्याने निर्माण केलेल्या व्यवस्थेला बदलविणारे आहे. या काव्यसंग्रहाचा एकूणच आशय हा माणूस आणि त्याने निर्माण केलेली शोषणकारी व्यवस्थाबदलविणे हा आहे. यासाठी कवीने आपल्या काव्यसंग्रहातील भावसंवेदनेच्या तळाशी आंबेडकरी विचारांचे कार्यकर्तृत्व केंद्रवर्ती ठेवले आहे. त्यांच्या प्रत्येक कवितेतून आंबेडकरी विचारदृष्टी प्रकट झालेली आहे आणि आंबेडकरांच्या विचारकर्तृत्वाच्या भावसंवेदना प्रकट केल्या आहेत. ते आपल्या 'कैफियत' या कवितेतून क्रांतीसूर्याच्या कर्तृत्वाबद्दल लिहितात.

''या निळ्या नभातील
तपन तेजाला साक्षी ठेवून
क्रांतीसूर्याने महाक्रांती केली
संपूर्ण हयात माणसांसाठी समर्पित केली''[3]

हे क्रांतीसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. त्यांच्या विचारक्रांतीने या देशातील माणसाला माणूस बनविण्यासाठी महाक्रांती केली. त्यासाठी त्यांनी आपली संपूर्ण हयात खर्च केली. डॉ. बाबासाहेबांची माणूस बनविण्याची महाक्रांती 1956 ला धम्मक्रांतीच्या रूपाने साकार झाली. कवी याच कवितेत पुढे म्हणतात–

''रंजल्या गांजल्या तमाम
कोट्यावधीचा तो महामेरू
महाबुद्ध झाला.
त्या अंधारलेल्या जगातील
किचपडलेल्या लेकरांचा
महासूर्य बाप झाला.'' [4]

माणसाने उभ्या केलेल्या विषमताकारी, शोषण व्यवस्थेतून, पशूत्वातून माणसाची मुक्ती करण्यासाठी आणि त्याला माणूस बनविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी बुद्धधम्म दिला. त्यांनी तमाम रंजल्या गांजल्यांना बावीस प्रतिज्ञा देवून बौद्ध केलेत. त्याला माणूस म्हणून प्रतिष्ठा दिली. त्याला स्वाभीमानाचे जीवन जगणे शिकवले. माणूस म्हणून त्याला स्वतंत्र अस्तित्व बहाल केले. त्यंच्या डोक्यावर नांदणाऱ्या सर्वच अमानुषसत्तेच्या दास्यत्वातून त्याला मुक्त केले. त्याला इहवादी केले. त्याच्या डोक्यातील मेंदू हाच जीवनाचे संचालन करतो आणि त्यामुळेच सर्वांचे सर्व कल्याण साधले जाते. हे सांगितले त्याला 'अत्त दिप भव' हे स्वतः स्वतःच स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार होण्याचे सूत्र सांगितले त्याला वैज्ञानिक दृष्टी दिली. त्याला प्रतित्यसमुत्पादात्तील कार्यकारणभाव सांगितला त्यांनी संविधानाद्वारे त्याला स्वातंत्र्य, समता, बंधुत्ता, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद दिला, त्याच्या जीवनाला सुरक्षितता दिली. त्याला वदम उंद वदमअंसनम दिले. म्हणून खितपत पडलेल्या, अंधारलेल्या जगातून माणसाला डॉ. आंबेडकरांनी उजेड दाखविला आहे. या बापाच्या महाबापाची कवी वर्तमान वास्तवातील समाजबांधवांना जाणीव करून देतात. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल कृतज्ञता आणि त्यांचे उर्वरित ध्येयस्वप्न साध्य करण्यासाठी समाजप्रवृत्तींनी, आंबेडकरी माणसांनी निष्ठेने जगले आणि वागले पाहिजे असे त्यांना वाटते. परंतु बेईमान वास्तव कवीच्या डोळयात सलते आणि कवी 'उमटी' या कवितेत लिहितात.

''आपल्या उत्क्रांतीची भरभराट
प्रगतीच्या दिशेने जात आहे.
पण..... काय करावं
अरे! आपणच मुर्खाचे माय–बाप
म्हणून आपल्याच घरात
आपलीच पोटजात नांदत आहे''[5]

वर्तमान सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तव जीवन उत्क्रांतमय, प्रगतीमय होत असतांनाच दुसरीकडे आपणच आपल्या महाबापाच्या जाती अंत विचारविरोधी वर्तन करतो आहे. आपल्या महाबापाने जाती निर्मलनासाठी जाती अंत सांगितला. कारण तो समाज आणि राष्ट्रविघातक आहे. नव्हे ते आपल्या सामाजिक, आर्थिक अवनतींचा धोंडा आहे. पण आज आंबेडकरी समाज आंबेडकर या महाबापाचे न ऐकता तो सवर्णांचे ऐकत आहे आणि आपल्या आपल्यातच जात आणि पोटजात पाळतो आहे. या अशा वास्तवाने कवी उदविग्न होतो. त्याला फार खंत वाटते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीची खरी जाणीव 'हुंदाडी' या कवितेतून करून देतो तो लिहितो

''धर्मान्तराच्या समयी
बापाने विचारली नाही
कुण्याही माणसाला...
आपापली पोटजात
आणि विचारल नाही
कुणाही माणसाला
त्याची औकात'' [6]

जात–पोटजात ही माणसाची ओळख पुसून काढण्याचे कार्य धम्मक्रांती द्वारे डॉ.आंबेडकरांनी केले. परंतु कवी आंबेडकरोत्तर काळातील बौद्ध

झालेल्या माणसाच्या अंतकरणातील वृत्ती– प्रवृत्तीवर ते गंडांतर या कवितेतून प्रहार करतात.

''बौद्ध झालो तरीही माणसा
शिस्त सोडून चळतो
पोटजातीचा आव आणूनी
उगेच आपण जळतो
कशा पेटल्या चुली वेगळया
बाबासाहेब गेल्यानंतर''[7]

डॉ. आंबेडकरांनी माणसाची ओळख ही बौद्ध म्हणून समाजाला दिली बौद्ध म्हणजे पंचशीलाचे आचरण शिस्त, प्रेम, करूणा, शांती, तृष्णेवर नियंत्रण आणि जात–पोटजात विहिरीत असा माणूस म्हणजे बौद्ध परंतु बाबासाहेबांच्या महापरिनिर्वानानंतर खरा बौद्ध झालेला माणूस बौद्ध राहिलेला कवीला दिसत नाही. तर पोटजातीचे बिऱ्हाड डोक्यावर घेऊन मिरवणारा दिसतो आहे.

''पोटजातीचे बिऱ्हाड
डोक्यावर घेऊन
समाजात मिरवणाऱ्या
माणसाला समाजानेच
पहिले धिक्कारले पाहिजे
त्यांना वाळीत टाकून
समाजानेच
त्याला बहिष्कृत केले पाहिजे''[8]

बौद्ध झालेला माणूस बौद्ध माणसालाच बहिष्कृत करू लागल्याचा आशय कवी आपल्या अस्सल वास्तवजीवना नुभाद्वारे अत्यंत पोटतित्रडकीडने व्यक्त करतो आहे. ही बौद्ध समाजात नविनच विकृती बौद्ध सांस्कृतिकतेच्या उदरात वास्तव्य करीत आहे आणि खऱ्या हिनयानवादी बौद्धत्वाला कलंकीत करीत आहे अशा विकृत मानसिकतेचे वर्तन करणाऱ्या आणि बौद्धत्वाचा विकृत अन्वयार्थ लावणाऱ्या माणासाला समाजाने धिक्कारावे, त्याला वाळीत टाकावे असे कवीला अंतर्मनातूनवाटते आहे. या युगाच्या जगण्याचा एकमेव आधार बाबासाहेब आहेत. त्यांनी जगातील सर्वात मोठी लेकशाही या देशाला बुद्धकाळातून प्राप्त करून दिली. पण आज आम्ही निराधार झालो

''भटकत आहो दिशा दाही
वाली आमचा कोणी नाही
ही लोकशाही की भांडवलशाही
हेच अजून कळले नाही'' [9]

समाजिक आणि आर्थिक समता समाजावाद प्रस्थापित झाला पाहिजे हे बाबासाहेबांचे स्वप्न लोकशाहीतून प्रकट झाले आहे. परंतु या देशात सामाजिक आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. भांडवलशाही या देशावर आजही राज्यकरीत आहे. तेव्हा सर्वसामान्य माणसाचा आधार असलेली लोकशाही ही भांडवलशाहीच्या अधिनस्त होऊन तीने सर्वसामान्यांना निराधार केले आहे.

अशा निराधार समाजाचे नेतृत्व करणारे नेतेही आंबडेकरी विचार चळवळीला उंचीवर नेण्याऐवजी पोत्यावर आणत आहे.

''जोवर होते बाबासाहेब
तोवर होती शिस्त
मतभेदांचे वादंग उठले झालेत अस्ताव्यस्त
स्वार्थामागे जे जे भटकले
त्या काय भरेसा नेत्यावर''[10]

आंबेडकरोत्तर काळात आंबेडकरी चळवळीचे समाजाचे पक्षाचे,गटांचे विविध तुकडे झालेत. या विविध तुकड्यांमागे स्वार्थीपणा दडलेला आहे. स्वार्थापाई नेते आंबेडकरी विचाराला बेईमान होत आहे. अशा वास्तवात कवी आंबेडकर विचार पुढे नेणारी चळवळ, समाज, पक्ष, गट आणि नेता निराधारला आधार देण्यासाठी उरला नसल्याचे प्रकटकरतो आहे.

या समकालीन वास्तवात कवीला माणसात, समाजजीवनात सदाचार, शांती, स्वयंशक्ती, वाणीचा गोडवा, समर्थ मनगट, विदेयब्ददल अनास्था अंतर्मनात झंजावात, रामतेचा पाईक पणा, डोक्यांनी लढण्याचेबळ लेखणीतील प्रतिभा, मातीचा ओलावा, माताचा गंध, परिवर्तन मानविता, जातीविहीनता, इत्यादीबाबी दिसत नाहीत. तर रामायण, महाभारत यांच्या सनातनी भाकड कथा रुढी– परंपरा, अंधश्रद्धा कवीला दिसतात. म्हणून कवी वास्तवाच्या मा मानसिकतेबद्दल तळमळतो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रज्ञेचा आकुत सर्वांना देऊन व्यवस्थेत परिवर्तन घडविण्याची भाषा करतो.

''म्हणून बाबासाहेब आमच्या
काळजाच्या देठावर तुमच्याच विचारांची
एकच असते प्रगल्भधारा
आणि तुम्ही दिलेला एकच नारा
शिका, संघटीतव्हा

आणि संघर्ष करा''[12]

व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणावयाचे असेल आणि वास्तवाला बदलावयाचे असेल तर शिकल्याशिवाय, संघटीत झाल्याशिवाय आणि संघर्ष केल्याशिवाय पर्याय नाही. त्यसाठीही त्रिसूत्री प्रत्येकांनी आपल्या काळजावर कोरून ठेवायला हवी. त्यासाठी गावाच्या मध्यवस्तीत तळपणाऱ्या महासूर्याच्या आणि बोधिवृक्षाच्या सम्यक छायेखाली एकत्र येणे कवीला महत्त्वाचे वाटते. तळपणाऱ्या महासूर्याच्या बोटांचा अंगुल निर्देश जात, धर्म, पंभविहीन जगण्याचा आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि माणसाने माणुसकीने जीवन जगणे सांगणारा आहे. संविधानाच्या मार्गाने प्रवास करायला सांगणारा आहे. कवी, लेखक आणि समाजाला सत्याच्या दिशेवर निष्ठा ठेवायला सांगणारा आहे. आणि व्यवस्था परिवर्तना साठी हुंदाडी देणाऱ्या क्रांतीचे ते गाव आहे. त्या बोटातून धावणारा वैचारिक आशय व्यवस्थेला हुंदाडी देण्यासाठी कार्य करीत आहे.

### कवितांची अभिव्यक्ती –

कवीने 'हुंदाडी ' काव्यसंग्रहातून जीवनविषयक आशय व्यक्त केला आहे. हा आशय कवीच्या जीवनानुभवाचा प्राण आहे तो जीवनातील विकृतीकडे पाठ करतो आणि प्रकृतीकडे तोंड करतो आहे. कवीच्या ठायी करूणामयी प्रज्ञा आहे. तीच त्यांचीआंबेडकरवादी जीवनदृष्टी आहे. ही आंबेडकरी जीवनदृष्टी त्यांच्या कवितेतील आशय रूपाने साकार झाली. या आशयाने त्यांच्या कवितेतील विद्रोह आणि नकाराचे रूप निश्चित केले आहे. कविने हा विद्रोह आणि नकार मराठी भाषेतूनव्यक्त केला आहे. त्यांच्या आंबेडकरी विचार आशयाने त्यांच्या काव्याचे भाषिक रूप घडविले आहे. हे भाषिक रूप आणि त्यांच्या काव्यातील आशय एकजीव आहे त्यांनी आशय प्रकट करण्यासाठी मसणवट्याचे दार, काकलूत गहिवरते, प्रज्ञेचा आकूत, गाडी, माडी, वाडी हुंदाडी, ठणक, कुंफ्कणी, तराठा, गरीब गुद्यांची, गडीगप्प, गडवे अशी नाना शब्दरूपे वापरली आहे. त्यामुळे त्यांची कविता वाचतांना सौंदर्यप्रतीतीचा आनंद देते. त्यांच्या कविता अभिव्यक्त होतांना आशयाची लय सोडत नाही. आशयाची व अभिव्यक्त शब्द रूपांचीलय यात सेद्रियता जाणवते. ते आशयाचे प्रकटीकरण आशयाला न्याय देणाऱ्या आणि वाचकाच्या अंतःकरणाला भावणाऱ्या अचूक शब्दरूपांचा वापर करतात. त्यांच्या कवितेतील शब्दरूप वाचतांना त्या शब्दांचे अर्थरूप मनात निर्माण होते आणि कविता समजते. त्यांच्या काव्यातील आशयाची लय शब्दाना नवे रूप देते. उदा. 'हिमालयासारख्याला मिठाचा मुतखडा झाला', त्सुनामी यासारख्या शब्दरूपांनी आशयाला लय प्राप्त झाली. कवीच्या 'आणू नका रे पोत्यावर' या सारख्या कवितेतून शब्दलय आणि आशयलय याचा प्रत्यय येतो.

''बिनबुडाचे निर्लज्ज गडवे
जिकडे तिकडे लोळते... ।।
फितुरलेले बदनाम भडवे
मध्येच गोंडा घोळते..''[13]

या कवितेतील गडवे, भडवे, लोळते, गोळते हे शब्दरूप शब्दलय आणि आशयलय यांच्या सेन्द्रिय बंदिशीचा अनुपम अनुभव देते तर जयघोषभीमाचा या कवितेतून

''जयघोष भीमाचा रोज दिनाला
होतोय आमच्या भेटीत.
जरी असेल गांधी नोटीत
पण विचार भीमाचे कोटीत''[14]

येथे शब्दांची लय, भावलय घेऊन येते ह्या शब्दाचे विशिष्ट आरोह– अवरोहात उच्चारण केले की नादलय निर्माण होते. अशा इहवादी व समाजवादी जीवनाच्या सौंदर्याचीप्रतिती कवी कवितेतून करून देतो.

### काव्य आकलनातून निर्देशनात आलेली वैशिष्ट्ये–

कवीच्या ''हुंदाडी या कवितासंर्ग्रहातील कवितांचे आकलन केले असता त्यांच्या काव्यांची काही ठळक वैशिष्ट्ये निर्देशनात येतात.
1) हुंदाडी हा काव्यसंग्रह प्रतिक्रांती आणि क्रांतीचा अन्वयार्थ घडवून देणारा आहे.
2) कवी प्रकाश खरतडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणा व आदर्श समोर ठेऊन 'हुंदाडी' काव्यसंग्रह जन्मालाघातला आहे.
3) या काव्यसंग्रहातून कवीचा जीवनानुभव हाच त्यांच्या काव्याचा भावनानुभव झाला असून त्यातून आंबेडकरी जीवनदृष्टी आणि कवीच्या संचार परिसरातील सूक्ष्म सामाजिक – सांस्कृतिकवास्तव हेच त्यांच्या काव्याशयाचे मर्म आहे.
4) मानवी जीवनाल प्रकाश देणाऱ्या महासूर्य डॉ. बबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनदृष्टीचा उजेड या काव्यसंग्रहातून अधोरेखित केला आहे.
5) कविने विचार आणि भावना यांची विभागणी न करता अनुभवातच अस्तित्वात असलेला विचार यांच्या संयुक्त बंदिशीचा अविष्कार केला आहे.
6) कवीची काव्यभाषा आंबेडकरी विचार–भावनेचा, निष्ठेचा प्रत्यय देणारी आहे.
7) त्यांच्या काव्यानुभव हा कोणत्याही कवितेच्या तंत्राला शरण न जाता उत्कट जीवनानुभवाच्या मुक्ततेला नव्या पण साजेशा रूपतंत्राला जन्माला घालणारा आहे.
8)कवीने आंबेडकरद्रोही बौद्ध आणि बौद्धत्तरे सामाजिक–सांस्कृतिक व्यवस्थेतील बेईमानाशी केलेला विद्रोह, नकार हा दुनियेच्या समतोल आणि संवादाचे मूल्य सौंदर्य प्रकट करणारा आहे.

### संदर्भ

1)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 13
2)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 6
3)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 7

Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

4)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 8
5)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 41
6)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 3
7)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 59
8)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 2
9)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 57
10)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 45
11)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 32
12)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 55
13)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 46
14)खरतडे प्रकाश नामदेव हुंदाडी यवतमाळ दि. 10 डिसेंबर 2016 पृ. 51

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org